# बीजेएसच्या माध्यमाने मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकयांच्या- मुला मुलींचे-शैक्षणिक पुनर्वसन

या वर्षी शेतक-यांच्या आत्महत्या हा एक जटील प्रश्न होवून बसला आहे. १ जानेवारी २०१५ पासून अगदी परवापर्यंत फक्त मराठवाड्यामध्ये ९५० शेतक-यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. महाराष्ट्राच्या दृष्टीने हि चिंतेची बाब आहे. आत्महत्त्या केलेल्या शेतक-यांची वयोमर्यादा पाहता कमी वयामध्ये आत्महत्या केलेल्यांची संख्या सुद्धा कमी नाही. आत्महत्या नंतर शेतक-यांच्या परिवारामध्ये खूप मोठे संकट उभे राहते. घरातील कर्ता माणूस गेल्यामुळे घर सांभाळण्याची, सावरण्याची व घरामध्ये असणारी १-२ मुलं-मुली यांच्या शिक्षणाची जबाबदारी त्या शेतक-याच्या विधवा पत्नीवर येते. यातून मार्ग काढण्यासाठी भारतीय जैन संघटनेने (बीजेएस) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुला-मुलींना ५ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी पुणे येथील वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात आणण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातबीड, लातूर व उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त ४२२ शेतकरी कुटुंबांमध्ये जाऊन सर्वेक्षण करण्यात आले आहे. या शेतक-यांच्या परिवारातील इयत्ता ५ वी ते १२ वीमध्ये शिक्षण घेणारी ३२५ मुलं-मुली आढळून आली. या सर्व विद्यार्थ्यांना पुणे येथे शिक्षणासाठी येण्याचा आग्रह बीजेएसने केला. परंतु प्रत्येक परिवारामध्ये इतक्या अडचणी आहेत कि त्यापैकी फक्त १२० विद्यार्थीच पुण्याला शिक्षणासाठी येऊ शकले. या विद्यार्थ्यांचे स्वागत आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार व श्री. गिरीशजी बापट यांच्या हस्ते करण्यात आले. सध्या हि मुले बीजेएसच्या पुणे येथील शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात स्वतःला सावरून शिक्षण घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मराठवाड्यामध्ये १ जानेवारी पासून १८ नोव्हेंबर पर्यंत जवळपास ९५० शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली व नांदेड या उर्वरित ५ जिल्ह्यांचे सर्वेक्षण संपत आले असून या ठिकाणाहून आणखी १५०-२०० मुलं-मुली शिक्षणासाठी पुणे येथे येऊ शकतील असा आमचा अंदाज आहे. या ५ जिल्ह्यातील विद्यार्थी १ डिसेंबर रोजी दुपारी १२.०० वाजता आपापल्या जिल्ह्यातून पुण्यासाठी

निघणार आहेत. दिनांक २ डिसेंबर रोजी पुणे येथे त्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन केले आहे. सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे आत्महत्या शेतक-यांची जिल्ह्यानुसार संख्या व संभाव्य मुलांची संख्या दिली आहे. या संख्येत थोड्याफार प्रमाणात बदल होऊ शकतो.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यात सर्वात जास्त आत्महत्या झाल्या आहेत. या सर्व आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांना बीजेएस तर्फे पुणे येथे ५ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण दिले जाणार आहे. कृपया आपण आपल्या जिल्ह्यामध्ये या शैक्षणिक यज्ञामध्ये सहभागी व्हावे व आपली लोकप्रिय दैनिकात प्रसिद्धी द्यावी हि विनंती.

| **अ. क्र.** | **जिल्हा** | **१ जानेवारी ते १८ नोव्हेंबर आत्महत्या केलेल्या शेतक-यांची संख्या** | **शिक्षणासाठी पुणे येथे येणा-या संभाव्य विद्यार्थ्यांची संख्या** |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | १२० | ८० |
| २ | जालना | ५८ | २८ |
| ३ | परभणी | ७१ | २८ |
| ४ | हिंगोली | ३२ | ३० |
| ५ | नांदेड | १६५ | ४५ |